नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे.
दूरध्वनी क्र.020 - 26124012
ईमेल आयडी - igr@igrmaharashtra.gov.in
jdtpvalu.pune@gmai.com

जा.क्र.का-15/आस्था/कंत्राटी नियुक्ती/ 813 दिनांक :- 05/08/2022

## जाहिरात

राज्यातील पुणे, कोकण, औरंगाबाद, नाशिक, अमरावती व नागपूर या 6 महसूली विभागातील जिल्हयांमधील वार्षिक मूल्य दर तक्ते प्रादेशिक योजना व विकास योजनेतील अनुज्ञेय भूवापराशी सुसंगत करुन अधिक वास्तववादी करणेकामी नगर रचना व मूल्यनिर्धारण विभागातून निवृत्त झालेले सहायक संचालक, नगर रचना, नगर रचनाकार व सहायक नगर रचनाकार एकूण 14 पदे तात्पुरत्या स्वरुपात सेवाकरार पध्दतीने भरावयाची आहेत. त्यासाठी निवडसूची (Empanelment) तयार करण्याकरिता नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,महाराष्ट्र राज्य,पुणे हे याव्दारे विहित नमुन्यातील आवेदन पत्र मागवित असून, इच्छूक उमेदवारांनी वरील पत्यावर त्यांची आवेदन पत्रे, आवश्यक त्या पुरक कागदपत्रांसह सादर करावीत.

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तयार केलेल्या सूची (Empanelment) मधील कर्मचाऱ्यांना त्या-त्या विभागातील मूल्यांकन कार्यालयाकडून करार पध्दतीने अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती खालील अटी व शर्तीवर देण्यात येणार आहे.

**सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

1) सदर नियुक्ती ही खालील प्रमुख व इतर अनुषंगिक विवक्षित कामासाठी राहील.
   अ) प्रादेशिक योजना व विकास योजनेतील अनुज्ञेय भूवापराशी मूल्यविभाग सुसंगत करणे.
   ब) मूल्यविभागाचे स्थानानुसार दरातील तफावती दूर करणे व इतर कामे.
2) करार पध्दतीने नियुक्ती करताना कमाल वयोमर्यादा ही 70 वर्षापेक्षा अधिक नसावी.
3) ही नियुक्ती प्रथमत: नियुक्तीच्या दिनांकापासून 6 महिने कालावधीसाठी असेल.
4) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत / सामावून घेण्याबाबत या नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.
5) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र /हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल.

6) सेवानिवृत्त अधिकारी यांची, विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करताना त्यांना मासिक परिश्रमिक व भत्ते सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13, दि.17 डिसेंबर 2016 नुसार अनुज्ञेय राहतील. तसेच सदर शासन निर्णयातील इतर अटी व शर्ती तसेच त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणेनुसारच्या अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

अर्जाचा नमुना व इतर तपशिल या विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर व सहसंचालक, नगर रचना, मूल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालय येथे उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

( श्रावण हर्डीकर )
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य,पुणे.

**<u>अर्जाचा नमुना</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | अर्ज केलेल्या पदाचे नांव | :- | |
| 2. | अर्जदाराचे संपूर्ण नांव | :- | |
| 3. | अर्जदाराचा पत्ता | :- | |
| 4. | भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी | :- | |
| 5. | जन्मदिनांक व वय | :- | |
| 6. | शैक्षणिक अर्हता | :- | |
| 7. | सेवेचा तपशिल | | |
| | अ. सेवानिवृत्तीपूर्वी कोणत्या कार्यालयात कार्यरत होते | :- | |
| | ब. सेवानिवृत्तीपूर्वीचे पद | :- | |
| | क. सेवानिवृत्त झाल्याची तारीख | :- | |
| 8. | अनुभव | :- | |
| 9. | पसंतीचे ठिकाण ( पुणे, कोकण, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या विभागीय मूल्यांकन कार्यालयाचे मुख्यालयाचे ठिकाणापैकी) | :- | |

उपरोक्त पदावर करार पध्दतीने नियुक्तीबाबत जाहिरात / सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून, सदर सुचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

स्थळ :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी

D/Sanap/Contract Basis Staff Prastav